प्रति,
प्रमुख वार्ताहर ,

दिनांक : २१ डिसेंबर २०१८

विषय : १९ वा पार्ले महोत्सव MC चषक उद्‌घाटन सोहळा.

सस्नेह नमस्कार ,

मुंबईत होणाऱ्या पार्ले महोत्सवास यंदा सुद्धा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून सुमारे ६० हजार स्पर्धक सहभागी होतील असा अंदाज आहे. पार्ले महोत्सवातील स्पर्धांसाठी स्पर्धक वर्षभर आतुरतेने वाट पहात असतात. अत्यंत तयारीने सहभाग घेणाऱ्या स्पर्धांमुळे महोत्सवामधील बक्षीस मिळवणे मानाचे ठरले आहे .यंदा ३५ प्रकारच्या स्पर्धांमधून विविध वयोगटांमध्ये सुमारे ३५० प्रथम पारितोषिकांसह ६००० स्पर्धकांना बक्षिसे बहाल करण्यात येतील.महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या प्रेरणेने होत असलेल्या MC चषक यामधील स्पर्धा पार्ले महोत्सवासोबत होणार आहेत. आपण दर वर्षी महोत्सवास प्रसिद्धी देऊन आम्हास तसेच स्पर्धकांना प्रोत्साहित करत असता याबाबत आम्ही ऋणी आहोत.

पार्ले महोत्सव MC चषक या कार्यक्रमाचा उद्‌घाटन सोहळा रविवार दि .२३ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता वामन मंगेश दुभाषी मैदान ,गुजरात सोसायटी समोर, साठ्ये महाविद्‌यालया जवळ ,विलेपार्ले पूर्व येथे होणार असून याप्रसंगी केंद्रीय मंत्री मा.श्री. प्रकाश जावडेकर उद्‌घाटक या नात्याने तर स्थानिक खासदार व भाजपा युवा मोर्चा राष्ट्रीय अध्यक्ष पूनमताई महाजन यांची प्रमुख उपस्थिती असेल.

आपण या कार्यक्रमास उपस्थित रहावे तसेच आपल्या वर्तमान पत्रामार्फत संपूर्ण महोत्सवास प्रसिद्धी देऊन मदत करावी ही विनंती.

धन्यवाद!

**आपला स्नेहांकित ,**

PAlwani

**ॲड पराग अळवणी ,आमदार**
**(प्रमुख आयोजक-पार्ले महोत्सव)**
**मोबाईल क्र : .९८२०३५०५४४**